**MHKO070000532006**

<u>रे.क.नं.२०/२००६ मधील नि.क्र.११४ वरील आदेश.</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.७ यांचे वारसांनी केला असून त्यांनी असे कथन केले आहे की, यातील प्रतिवादी नं.७ साहेबहजरत इनामदार हे दि.२/७/२०१८ रोजी मयत झालेले आहे. सदर प्रतिवादी हे याकामी हजर झाले होते. मयत साहेबहजरत इनामदार यांना हजर करुन घेणेचा आदेश केला होता सदर आदेशाविरुध्द वादीने कोठेही दाद मागितलेली नाही. सदर मयत साहेबहजरत इनामदार यांचेकडून वादी व वादी तर्फे साक्षीदारांचा उलटतपास घेतला गेला असून स्वतः साहेबहजरत इनामदार याचा तोंडी पुरावा नोंदला गेला आहे. त्याचप्रमाणे सदरचे प्रकरण हे वादीतर्फे युक्तीवादावर नेमले असताना प्रतिवादी नं.७ हे मयत झाले आहेत. अर्जात नमुद क्रं.१ हया मयत साहेबहजरत इनामदार यांची पत्नी असून क्रं.२ ते ४ हे त्याची मुले आहेत. त्याचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत साहेबहजरत इनामदार यांचा हक्क हितसंबंध असलेचे पाहूनच गुणदोषावर मे.न्यायालयाच्या आदेशाने पक्षकार केले गेले आहेत. मुळ कामी पक्षकार असल्यामुळेच व त्यांनी काम चालविल्यामुळे तसेच त्यांचा दावा चालविण्याचा हक्क प्रस्तुत वारस यांना प्राप्त झालेले आहे. सदर कामी मुळ प्रतिवादी यांनी चालविलेले काम प्रस्तुत वारस यांना पुढे चालविणेचे आहे. मुळ प्रतिवादी यांनी वादी यांचे तथाकथीत कराराची सत्य वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर आणली आहे. प्रस्तुत प्रकरण हे अंतिम टप्प्यात आले त्यामुळे मयत वारसांना सदर काम पुढे चालविणेस परवानगी मिळणे आवश्यक आहे. मुळ प्रतिवादी याकामी सामील असल्यामुळे व त्यांनी काम चालविलेमुळे प्रस्तूत वारसदार यांना याकामी सामिल करुन घेतलेस कोणतीही नवीन केस निर्माण होत नाही. तसेच वादी व त्यांचे दावेवर त्याचा कसलाही परिणाम होणार नाही. सबब, प्रस्तुत वारस अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी तर्फे नि.१२२ कडे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, सीपीसी १५१ प्रमाणे सदरचा अर्ज देता येत नाही. सी.पी.सी. ऑ. २२ रुल ४ प्रमाणे ज्या काटेकोर अटी आहेत त्याची पूर्तता झाली खेरीज कोणासही सी पी सी मधील अन्य तरतुदीचा वापर करता येणार नाही. प्रस्तुत कामी मयत साहेब हजरत यांनी त्याचा कोणताही संबंध नसताना थर्ड पार्टी म्हणून अर्ज दिला होता त्यास वादींनी हरकत घेवू नये त्यास प्रतिवादी म्हणून सामील केले होते. प्रस्तुतचा दावा वादी व प्रतिवादी नं.१ ते ६ याच्या दरम्यानचा आहे. दावेकामी प्रतिवादी नं.१ ते ६ त्याचे विरुध्द खरेदीपत्र पुरे करुन मागितले आहे. संपूर्ण दावे कामात प्र.वादी नं.७ विरुध्द कोणतीही मागणी नाही तरी त्याचा काही संबंध नसता सदर प्र.वादी आम्ही कैफियत देवून जबाब दिला आहे. सध्या प्रस्तुत प्रतिवादी हे मयत झालेला आहे. त्याच्या वारसांची अगर कायेदशीर प्रतिनिंधीची कोणतीही आवश्यकता नाही नि.११४ चा अर्ज् बेकायदेशीर असून चालण्यास पात्र नाही. सी.पी.सी. ऑ २२ रुल ४ याच्या तरतुदीखाली सदरचा अर्ज् बसत नाही. प्र.वादी नं.७ हे मयत झाल्याने इतर प्रतिवादी विरुध्द दाव्याचा हक्क शिल्लक राहत होता. आणि तो दाव्यात सामील होण्यापूर्वी सदरचा हक्क शिल्लक होता अशापरिस्थीतीत मयत प्र.वादी नं.७ यांच्या वारसांचे कोणतेही काम नसल्यामुळे त्यांना पक्षकार करण्याची काही एक गरज नाही. वादीस दाव्यातील दाद मिळू नये या दुष्ट हेतुने सदरचा अर्ज केला असल्याने तो खर्चासह नामंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदारतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अर्जदाराचे पूर्वहक्कदार हेच प्रस्तुत दाव्यात ति-हाईत इसम म्हणून हजर झालेले आहेत व त्यांनी त्याची कैफियत सुध्दा दाव्यात दिलेली आहे. तद्नंतर वादी यांनी दाव्याच्या सुनावणीच्या वेळेस त्यांचा उलटतपास सुध्दा घेतलेला आहे. त्याचबरोबर सदरहू अर्जदाराचे पूर्वहक्कदार यांनी दाव्यामध्ये त्यांचा पुरावा सुध्दा दिलेला असून त्याच्या वतीने युक्तीवाद सुध्दा करण्यात आलेला आहे. त्यानंतर वादीच्या युक्तीवादासाठी प्रस्तुत प्रकरण असताना प्रतिवादी नं.७ हे मयत झालेले आहेत. त्यामुळे वादीस त्यांना अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करुन घ्यावयाचे

नाहीत असे म्हणता येणार नाही. अर्जदार हे मयत प्रतिवादी नं. ७ याचे वारस म्हणून प्रस्तुतचे अर्जान्वये स्वतः आलेले आहेत. तरी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा.

४. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मयत प्रतिवादी नं.७ हा मुळतः दाव्यामध्ये वादी याने पक्षकार केलेला नव्हता. प्रतिवादी नं.७ हे प्रस्तुत दाव्यात ति-याईत इसम म्हणून हजर झालेले आहेत. तसेच प्रस्तुत दाव्यात वादी हे ज्या करारपत्राबाबत दाद मागत आहेत त्या करारपत्रात प्रतिवादी नं.७ हे पक्षकार नव्हते. त्यामुळे मयत प्रतिवादी नं.७ याचे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे नाही. त्याचबरोबर वादी हे सदर मयत प्रतिवादी नं.७ याचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यास त्याचे जे काही परिणाम होतील ते परिणाम भोगण्यास तयार आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे वाचले. तसेच दाव्यातील कागदपत्रे पाहीली. प्रस्तुतचा दावा वादी यांनी खरेदीखत पुरे होवुन मिळण्याबाबत केलेला आहे. प्रतिवादी नं. ७ यांनी नि.नं.७ अन्वये प्रस्तुत दाव्यात त्यांना पक्षकार म्हणून नोंद करुन घेण्याबाबत अर्ज केला होता. सदर अर्जामध्ये दावा मिळकत ही प्रतिवादी याचे पूर्वहक्कदार म्हणजेच साहेबपाशा हे त्यांचे भाऊ असल्याचे कथन करुन दावा मिळकतीबाबत त्याच्यामध्ये वाद असताना प्रतिवादी याच्या पूर्वहक्कदारांनी दावा मिळकतीच्या वादी याच्या हक्कात करारपत्र करुन दिलेले आहे. दावा मिळकतीबाबत प्रतिवादी नं.७ व प्रतिवादी याचे पूर्वहक्कदार याचेमध्ये वाटप झालेले नाही अशा आशयाचा मजकूर कथन करुन त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करण्याबाबत विनंती केली होती. सदरचा अर्ज हा न्यायालयाने मंजूर करुन प्रतिवादी नं.७ यांना दाव्यामध्ये समाविष्ट केलेले आहे. प्रस्तुत अर्जदार हे प्रतिवादी नं.७ याचे वारस आहेत. त्यांनी त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत दिलेले असून त्याच्या व्यतिरिक्त प्रतिवादी नं.७ यांना अन्य वारस नसल्याचे नमुद केलेले आहे. प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकती संदर्भात आहे. वादी त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार यांनी दिवाणी प्रकिया संहिता आदेश २२ नियम ४ ची पूर्तता न करता दिवाणी प्रकिया संहिता कलम १५१ अन्वये दाखल केला

याकारणास्तव प्रस्तुतचा अर्ज फेटाळल्यास प्रकरणातील गुंतागुत वाढून दाव्याची संख्या वाढण्याची शक्यता आहे. अर्जदार यानी नि.क्र.११६ सोबत प्रतिवादी नं.७ याचा मृत्यूदाखला दाखल केलेला आहे तो पाहता प्रतिवादी नं.७ हे दि.२/०७/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी नं.७ यांच्या मृत्युनंतर दावा चालविणेचा अधिकार टिकून रहात असल्याने तसेच प्रस्तुतचे अर्जदार हे त्यांचे वारस असल्याने प्रस्तुत दाव्याकामी अर्जदार यास पक्षकार करणे गरजेचे वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांना आदेशीत करण्यात येते की, प्रतिवादी क्र.७ यांचे वारस म्हणुन प्रस्तुत अर्जदार याची नोंद करुन घेणेत यावी. तसेच त्याबाबतची दावा दुरुस्त प्रत प्रस्तुतकामी दाखल करावी.

सही/-

(विश्वास पां.शिंदे)

दि.२१/०६/२०१९ २ रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर जयसिंगपूर.